अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक, कांदळवन कक्ष, मुंबई यांचे कार्यालय,
एस.आर.ए.बिल्डींग, ए-विंग, दुसरा मजला, अनंत काणेकर मार्ग, बांद्रा (पूर्व), मुंबई-51.फोन
व फॅक्स-022 26591586, Email:-ccfmangrove@mahaforest.gov.in/ccfmmumbai@gmail.com

विषय :- कोकण विभागातील वेटलँड संदर्भात
पाणथळ तक्रार निवारण समितीची
बैठकीचे मंजूर इतिवृत्तांत.

जा.क्र.उप.व/कांकमुं/सभा/ ८६ /२०१७-१८
बांद्रा. दिनांक :- १६/ ०१/२०१८

प्रति,

१. विभागीय आयुक्त, कोकण विभाग, नवी मुंबई.
२. मुख्य वनसंरक्षक कांदळवन कक्ष, मुंबई.
३. जिल्हाधिकारी, मुंबई/ मुंबई उपनगर/ ठाणे/ पालघर / रायगड / रत्नागिरी / सिंधुदुर्ग.
४. पोलिस आयुक्त, मुंबई/ठाणे यांचे प्रतिनिधी.
संबंधित जिल्हा पोलीस अधिक्षक, [ठाणे (ग्रामीण) /पालघर/ रायगड/ रत्नागिरी/ सिंधुदुर्ग]
५. संचालक पर्यावरण विभाग.
६. महानगर पालिका आयुक्त / सह आयुक्त (मुंबई / नवी मुंबई / ठाणे / मिरा भाईंदर/ वसई-विरार / कल्याण-डोंबविली / भिवंडी निझामपुर / उल्हासनगर.)
७. श्री. . दयानंद स्टॅलिन, संचालक, वनशक्ती अशासकीय संस्था.
८. प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ.
९. नगर रचना विभागाचे अधिकारी / CIDCO यांचे प्रतिनिधी.
१०. डॉ. महेश शिंदीकर, Applied dept of Science, College of Engineering Pune.
११. अपर आयुक्त, विभागीय आयुक्त कार्यालय, कोकण विभाग.

उपरोक्त विषयान्वये कोकण विभागातील वेटलँड संदर्भात पाणथळ तक्रार निवारण समितीची 9वी मासिक बैठक दिनांक 04/09/2017 रोजी मा. विभागीय आयुक्त यांच्या अध्यक्षेतेखाली कोकण आयुक्त कार्यालय, कोकण विभाग नवी मुंबई येथे घेण्यात आली सदर बैठकीची मंजूर इतिवृत्तांत माहितीसाठी व पुढील कार्यवाहीसाठी सादर करण्यात येत आहे. त्याबाबतचा अहवाल पुढील बैठकीमध्ये सादर करावा.

सदस्य सचिव,
कोकण पाणथळ तक्रार निवारण समिती
तथा
उपवनसंरक्षक कांदळवन कक्ष, मुंबई

सदस्य सचिव यांनी उपस्थित सभासदांचे स्वागत केले आणि सभेला सुरुवात केली.

| अ.क्र. | मुद्दा | करावयाची कारवाई | अंमलबजावणी करणारी यंत्रणा |
|---|---|---|---|
| १ | मागील इतिवृत्तामधील प्राप्त तक्रारी अर्ज आणि जनजागृती संदर्भात अंमलबजावणी करणाऱ्या यंत्रणेने केलेल्या कार्यवाहीचा अहवाल. | १) श्री. अनिकेत सतिश वाडीवकर :-<br><br>सदर तक्रारी संदर्भात मा. आयुक्तांनी महानगरपालिकेला डेब्रीज लवकरात लवकर काढण्यासंबंधी सुचना दिल्या असुन त्यासंबंधी खर्च दोषींकडुन वसुल करण्यासाठी संबंधित तहसिलदारास RRC जमा करावी असे सांगितले. तसचे संबंधित उपवनसंरक्षक यांनी कांदळवन लागवडीचे अंदाजपत्रक जिल्हाधिकारी पालघर यांच्याकडे जमा करावे व त्यासाठी लागणारा खर्च दोषींकडुन वसुल करुन घेण्याच्या सुचना मा. आयुक्तांनी संबंधितांना दिली. | जिल्हाधिकारी पालघर, उपवनसंरक्षक ठाणे. |
| | | २) श्री. विवेकानंद गुप्ता :- • संबंधीत तक्रारीसंबंधी विभागीय वनअधिकारी, मुंबई कांदळवन संधारण घटक यांच्याकडुन अहवाल अप्राप्त असल्याची माहिती मुंबई उपनगर यांच्याकडील प्रतिनिधींनी मा. आयुक्तांना दिली. सदर अहवाल हा पुढील कार्यवाही करण्यासाठी २ आठवडयाच्या आत जिल्हाधिकारी मुंबई उपनगर यांना सादर करावा अशी सुचना मा. आयुक्तांनी, विभागीय वनअधिकारी, मुंबई कांदळवन संधारण घटक यांना दिली.<br><br>• महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाचे प्रतिनिधी सदर बैठकीमध्ये उपस्थित नव्हते. त्यामुळे मा. आयुक्तांनी महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाचे सदस्य सचिव यांना सुचना दिल्या की त्यांनी | जिल्हाधिकारी मुंबई उपनगर, विभागीय वन अधिकारी, मुंबई कांदळवन संधारण घटक, सदस्य सचिव. |

| | | | |
|---|---|---|---|
| | | त्यांच्या विभागातील एका प्रादेशिक अधिकाऱ्याची सदस्य म्हणुन निवड करावी जेणेकरुन वेटलँड संदर्भात होणाऱ्या पुढील बैठकीपासुन ते आपले प्रतिनिधी म्हणुन उपस्थित राहतील.. | |
| | | ३) **श्री. धीरज परब :- सदर विषयाबाबत मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या वतीने सदर बैठकीमध्ये** कोणीही **प्रतिनिधी उपस्थित नव्हते. त्यासंदर्भात मा. आयुक्तांनी दुरध्वनीद्वारे संपर्क साधला व** पुढील बैठकीमध्ये उपस्थित राहण्याबाबत तसेच **सदर विषयाबाबतचा अहवाल पुढील बैठकीच्या आत** सादर **करण्याच्या सुचना** दिल्या. तसेच सदर विषयाबाबतचा संपुर्ण अंतरिम अहवाल पुढील बैठकीच्या आत सादर करावा अशी सुचना मा. आयुक्तांनी संबंधितांना दिली. | आयुक्त मिरा भाईंदर महानगरपालिका. |
| | | ४) **श्री. कुलदीप चौधरी** :- सदर तक्रारीसंदर्भात pwd engineer यांनी डेब्रीज काढण्यासंबंधीचे अंदाजपत्रक जमा केले असल्याची माहिती **उपविभागीय अधिकारी, वसई यांनी** समितीसमोर दिली. परंतु लागवडीसाठीचे अंदाजपत्रक वनविभागाकडुन प्राप्त नसल्याचे सांगितले. त्याअनुषंगाने संबंधित उपवनसंरक्षक यांनी त्यांच्याकडील अंदाजपत्रक जिल्हाधिकारी पालघर यांना पाठवावे अशी सुचना मा. आयुक्तांनी सदस्य सचिव यांना दिली. | जिल्हाधिकारी पालघर, उपवनसंरक्षक ठाणे, सदस्य सचिव. |
| | | ५) **श्री. रोहित जोशी** :- •सदर तक्रारीसंदर्भात उपायुक्त ठाणे महानगरपालिका यांनी १ कोटी, २० लाख रुपयाची दंडाची वसुली करावी लागेल असे सांगितले. त्यानुसार मा. आयुक्त यांनी RRC स्वरुपात वसुली करण्याचे आदेश संबंधित यंत्रणेला दिले. तसेच उर्वरित डेब्रीज २ महिन्याच्या आत काढुन टाकण्याच्या सुचना दिल्या. | महानगरपालिका ठाणे. |

| | | | |
|---|---|---|---|
| | | ६) श्री. हरीश पांडे :-<br><br>सदर प्रकरणाची चौकशी झाली असुन दोन दिवसाच्या आत अहवाल सादर करण्यात येईल अशी माहिती जिल्हाधिकारी मुंबई उपनगर यांचे प्रतिनिधी, अधिक्षक, मुंबई नगर भुमापन व भुमि अभिलेख (शहर) जिल्हाधिकारी, मुंबई शहर यांनी मा. आयुक्त यांना दिली. | जिल्हाधिकारी मुंबई उपनगर: |
| | | ७) श्री. फ्रान्सिस डिसोजा:-<br><br>• सदर प्रकरणी जेथे अतिक्रमण बांधणी झाली आहे त्याची यादी तयार करणे.<br><br>• तसेच ज्या अतिक्रमीत बांधकामावर कोणत्याही प्रकारची Stay order नाही ते लवकर काढुन टाका अशी सुचना उपविभागीय अधिकारी, वसई यांना मा. आयुक्तांनी दिली. | जिल्हाधिकारी पालघर |
| | | ८) श्री. अनंत दत्तात्रय पाटील :- • सदर प्रकरणी जेथे अतिक्रमण बांधणी झाली आहे त्याची यादी तयार करणे<br><br>• तसेच ज्या अतिक्रमीत बांधकामावर कोणत्याही प्रकारची Stay order नाही ते लवकर काढुन टाका अशी सुचना उपविभागीय अधिकारी, वसई यांना मा. आयुक्तांनी दिली. | जिल्हाधिकारी पालघर |
| | | ९) श्री. मॅकेन्झी डाबरे :- श्री. मॅकेन्झी डाबरे यांच्या तक्रारीसंदर्भात पोलीस स्टेशन वसई येथे २७/०४/२०१७ रोजी CRZ अंतर्गत गुन्हा दाखल केला होता व अनधिकृतपणे भराव केल्याबाबत दंडात्मक रकमेची | जिल्हाधिकारी पालघर. |

| | | | |
|---|---|---|---|
| | | नोटीस निर्गमित करण्यात आली होती अशी माहिती तहसिलदार, वसई विरार महानगरपालिका यांनी समितीसमोर सादर केली. | |
| | | १०) श्री स्टॅलिन डी. :- •सदर तक्रारीसंदर्भात मा. आयुक्तांनी जमिन मालक व इतर दोषींविरुध्द गुन्हा दाखल करण्याच्या सुचना संबंधित यंत्रणेला दिल्या. •जिल्हा पोलिस अधिक्षक, पालघर यांना त्यांच्याशी संबंधीत सर्व तक्रारींचा अहवाल घेऊन पुढील बैठकीमध्ये उपस्थित राहण्यासाठी संबंधितांना पत्राद्वारे कळवावे अशी सुचना सदस्य सचिव यांना दिली. | जिल्हाधिकारी पालघर. पोलिस अधिक्षक पालघर, सदस्य सचिव. |
| | | ११) New Link Road Residence Forum, Dahisar West यांनी गोराई खाडी मध्ये भराव करण्याबाबत तक्रार केलेली होती. सदर प्रकरणाचा अहवाल मुंबई कांदळवन संधारण घटक, मुंबई यांच्या कार्यालयाकडुन प्राप्त झालेला नाही असे जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांचे प्रतिनिधी यांनी मा. आयुक्तांना सांगितले. परंतु मा. उच्च न्यायालयाने दिलेल्या सुचनेनुसार सदर विषयाबाबतचा संपुर्ण स्थळपाहणी करुन त्याबाबतचा संपुर्ण अहवाल कांदळवन कक्ष यांच्या कार्यालयातुन यापुर्वीच मा. उच्च न्यायालयास व सरकारला देण्यात आला आहे अशी माहिती अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक कांदळवन कक्ष मुंबई यांनी समितीसमोर सांगितली. कांदळवन कक्ष यांच्या कार्यालयातुन पाठविलेल्या अहवालाच्या अनुषंगाने आवश्यक ती कारवाई करावी अशी सुचना मा. आयुक्तांनी जिल्हाधिकारी, मुंबई | जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर. |

| | | | |
|---|---|---|---|
| | | उपनगर यांना दिली. | |
| | | १२) **धीरज परब:- सदर तक्रारीसंदर्भात मिरा भाईंदर महानगरपालिका यांच्यावतीने कोणीही उपस्थित नव्हते.** सदर प्रकरणी मा. आयुक्त यांनी आयुक्त मिरा भाईंदर महानगरपालिका यांच्याशी दुरध्वनीद्वारे संपर्क साधला व अंतरिम अहवाल पुढील बैठकीपुर्वी सादर करण्याच्या सुचना दिल्या. | मिरा भाईंदर महानगरपालिका. |
| | | १३) **श्री. नंदकुमार पवार:-** •**सदर तक्रारीच्या विषयासंदर्भात माहिती देण्यासाठी जिल्हाधिकारी ठाणे यांच्यावतीने कोणीही अधिकारी / प्रतिनिधी उपस्थित राहु शकले नाही.**<br><br>• मा. अध्यक्षांनी जिल्हाधिकारी ठाणे यांच्याशी संपर्क साधला असता **सदरचे क्षेत्र हे** उपविभागीय अधिकारी भिवंडी यांच्या **कार्यक्षेत्रात येत** असल्याची माहिती जिल्हाधिकारी ठाणे यांनी मा. आयुक्तांना दिली.<br><br>• त्याअनुषंगाने सदरची तक्रार उपविभागीय अधिकारी, भिवंडी यांच्याकडे पाठविण्यात यावी व त्यासंबंधी अहवाल ८ दिवसाच्या आत समितीसमोर सादर करावा अशी सुचना मा. आयुक्तांनी संबंधितांना दिली. | जिल्हाधिकारी ठाणे. |
| | | १४) **श्री. दिलीप मुकुंद पाटील :-**<br><br>• **सदर तक्रारीसंदर्भात** जिल्हाधिकारी पालघर यांनी स्वत: पडताळणी केली असुन सदर जमिनी ही खाजगी जमिन असल्याची माहिती मा. आयुक्तांना दिली. | जिल्हाधिकारी पालघर व संबंधित यंत्रणा. |

| | | | |
|---|---|---|---|
| | | •सदर प्रकरणी जिल्हाधिकारी पालघर यांनी वसई विरार महानगरपालिका यांना डेब्रिज काढुन टाकण्यासंदर्भात पत्र लिहावे अशी सुचना मा. आयुक्तांनी जिल्हाधिकारी पालघर यांना दिली. | |
| | | १५) **श्री. ॲल्विन विन्सॅट रॉड्रीग्ज :-**<br><br>• सदर तक्रार ही भातशेती या संदर्भात आहे.<br><br>• भातशेती ही वेटलॅंड म्हणुन संबोधले जात नाही. त्यामुळे सदर तक्रार बंद करण्याचा निर्णय समितीने घेतला. | सदस्य सचिव |
| | | १६) **धीरज परबः-** सदर तक्रारीसंदर्भात मिरा भाईंदर महानगरपालिका यांच्यावतीने कोणीही उपस्थित नव्हते. त्यामुळे याबाबत बैठकीमध्ये कोणतीही चर्चा झाली नाही. | मिरा भाईंदर महानगरपालिका. |

सदर सभेस उपस्थित सदस्यांचे आभार मानुन बैठक संपल्याचे सचिवांकडुन जाहिर करण्यात आले.

अध्यक्ष,
कोकण पाणथळ तक्रार निवारण समिती
तथा
विभागीय आयुक्त, कोकण विभाग